लग्न म्हणजे बस्ता
बस्ता म्हणजे राजेंद्र
१९६९ पासून राजेंद्र
मेन रोड, संगमनेर. फोन : 02425 - 225740, मोबा : 7901031155



संगमनेर । अकोले । कोपरगाव । राहाता । श्रीरामपूर । राहुरी । नेवासा । शेवगाव येथून एकाच वेळी प्रसिध्द..

बांधिलकी जनहिताची

# नायक

सायं.दैनिक

संपादक : गोरक्षनाथ मदने | कार्यकारी संपादक : श्याम तिवारी

Sangamner | MAHMAR/2018/75654 | वर्ष ८ | अंक ६७ | १६/७/२०२५ (दैनिक) | किंमत रु.२/- | पाने ४



हरिचंद टेक्सटाईल्स मार्केट
एथनिक वेअर | बस्त्यासाठी खास सोय
नामांकित कंपन्यांचे सुटींग शर्टींग | होलसेल साडी डेपो
आम्ही जपतो तुमचा विश्वास..!
मार्केट यार्ड जवळ, नाशिक-पुणे हायवे, संगमनेर ,7972842036

आला रे आला राजपाल सेल आला..!
स्मार्ट असो वा मार्ट.. मिल असो वा मॉल.. सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा राजपाल
संगमनेर (02425) 222226 | अ. नगर (0241) 2999299 | नारायणगाव (02132) 242132 | श्रीरामपूर (02422) 220090

कोथमिरे MASALE — चवीला खरे कोथमिरे!
स्वाद, स्वास्थ्य, सर्वांगसुंदर मसाले सारे, चवीला खरे कोथमिरे मसाले !
सन १९९२ पासून ग्राहकांच्या पसंतीस उतरलेले मसाले
कोथमिरे मसाले +91 9370584332 www.kothmiremasale.com


# रेल्वेमार्गाला समांतर औद्योगिक महामार्गाचा विचार अव्यवहार्य!



## एमएसआरडीसीचा राज्य सरकारला अहवाल

## मूळ संरेखनानुसारच 'पुणे-नाशिक'चा प्रस्ताव

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

एकीकडे पुणे-नाशिक सेमी हायस्पीड रेल्वेमार्गाबाबत साशंकता निर्माण झालेली असताना दुसरीकडे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचा 'ड्रीम प्रोजेक्ट' असलेल्या औद्योगिक महामार्गाच्या हालचाली मात्र वाढल्या आहेत. पुणे ते नाशिक व्हाया संगमनेर प्रवासाचे अंतर पाच तासांवरुन अवघ्या अडीच तासांवर आणण्याच्या 'एमएसआरडीसी'च्या या २८ हजार ४२९ कोटी रुपयांच्या महत्त्वकांक्षी प्रकल्पाला यापूर्वीच राज्य शासनाची मंजुरी मिळाली आहे, त्यासाठी भूसंपादनाची प्रक्रिया सुरु आहे. अशावेळी राज्य सरकारने सदरचा प्रकल्प सेमी हायस्पीड रेल्वेमार्गाला समांतर नेता येईल का याबाबतची चाचपणी करण्याच्या सूचना महामंडळाला केल्या होत्या. त्याचा अहवाल शासनाला सादर करण्यात आला असून हा प्रकल्प रेल्वेमार्गाला समांतर नेण्याचा विचार तांत्रिक व आर्थिकदृष्ट्या अव्यवहार्य असल्याने मूळ संरेखनानुसारच तो मार्गी लावण्याची परवानगी मागण्यात आली आहे. २१३ किलोमीटर अंतराच्या या सहा पदरी द्रूतगती महामार्गातील १३३ किलोमीटरचा भाग नव्याने (ग्रीन फिल्ड) बांधला **(पान ३ वर)**

■ विशेष करुन पुणे व अहिल्यानगर जिल्ह्यातील अविकसित गावांना वरदान ठरणाऱ्या पुणे–नाशिक औद्योगिक द्रूतगती महामार्गाच्या प्राथमिक संरेखनानुसार पुणे जिल्ह्यातील चिंबळी, चाकण, पाबळ, खेड, शिरुर, आंबेगाव आणि जुन्नर तालुक्यांसह अहिल्यानगर जिल्ह्यातील खंदरमाळ, साकूर, मांची, कसारे या मार्गाने निफाड तालुक्यात सुरत–हैद्राबाद या आंतरराज्य महामार्गाशी तो जोडला जाणार आहे. या प्रकल्पासाठी २८ हजार ४२९ रुपयांचा खर्च अपेक्षित धरण्यात आला आहे. हा महामार्ग आकाराला आल्यानंतर जिल्ह्यासाठी दक्षिणेसह उत्तर भारताकडे जाणारे प्रवेशद्वारच उघडले जाणार आहे.

# लाभक्षेत्रात पावसाची पूर्णत : उघडीप!

## आढळा, म्हाळुंगी आटली; भंडारदऱ्याच्या पाणीसाठ्यातही भर

**नायक वृत्तसेवा, अकोले**

आठवड्याच्या सुरुवातीपासूनच जिल्ह्यातील बहुतेक भागातून माघार घेणाऱ्या मान्सूनने मंगळवारी पूर्णतः उघडीप घेतली. उत्तरेतील बहुतेक तालुक्यांमध्ये सूर्यदर्शनही झाल्याचे बघायला मिळाले. मात्र त्याचवेळी सोमवारी रात्रीनंतर अकोले तालुक्याच्या पश्चिम घाटांवर आषाढसरींना काहीसा जोर चढला. त्यामुळे मुळा व भंडारदऱ्यातील पाण्याची आवक काही प्रमाणात वाढली. मात्र त्या उपरांतही भंडारदऱ्याच्या विसर्गात कोणताही बदल करण्यात आला नाही. एकीकडे मोठ्या धरणांच्या पाणलोटात पावसाला किंचित जोर चढला असताना दुसरीकडे आढळा, भोजापूरच्या पाणलोटात मात्र पूर्णतः उघडीप मिळाल्याने दोन्ही नद्यांचे प्रवाह आता थांबले आहेत.

अवकाळीच्या माध्यमातून मे महिन्यातच धोऽ धो बरसणाऱ्या पावसाने पाणलोटासह धरणांच्या लाभक्षेत्रांमध्येही समाधानाचे **(पान ३ वर)**

# जवान संदीप घोडेकर यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

संगमनेर शहरातील घोडेकर मळा येथील रहिवासी आणि सध्या दिल्ली येथे सी आर पी एफ मध्ये कार्यरत असलेले जवान संदीप किशोर घोडेकर यांचे कर्तव्यावर असताना मंगळवारी पहाटे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले.



जवान संदीप घोडेकर यांच्या निधनाची बातमी समजताच घोडेकर मळ्यासह तालुक्यात शोककळा पसरली आहे. १४ वर्षापासून जवान संदीप घोडेकर सी. आर. पी. एफ मध्ये कार्यरत होते. त्यांची सेवा सर्वाधिक नक्षलवादी भाग असलेल्या **(पान ३ वर)**


सेल सेल सेल
अशी संधी एकदाच येते !
MONSOON DHAMAKA
₹1500 ते ₹5000 ची साडी फक्त ₹499/-
स्टॉक कधीही संपू शकतो आजच भेट द्या !
भंडारी सिल्क अँण्ड सारीज
मेनरोड कॉर्नर, संगमनेर, जि. अहिल्यानगर

HOTEL Super DIAMOND
पार्टीसाठी हॉल • प्रशस्त गार्डन • निसर्गरम्य वातावरण
• कॉन्फरन्स हॉल • फॅमिली डायनिंग • प्रशस्त पार्किंग
पत्ता - महात्मा फुले चौक, पावबाकी, संगमनेर मो. 9503925050, 7775052432
श्री. प्रमोद अशोकराव हिरे | चि. ऋतिक संतोषराव हिरे

NATURE EARTH
RESTAURANT & AGRO RESORT
Kolhewadi Phata, Behind Shetkari Agro Clinic, Vadgaon Pan, Sangamner, Dist. A. Nagar
natureagroresort@gmail.com / www.natureagroresort.com 88 477 88 099 / 89 75 40 82 85
CONFERENCE HOLL | RESTAURANT | ROOMS | CONFERENCE PAD

OM MAYUR JEWELLERS
आपुलकीचे नाते विश्वासाचे व्यापे
ओममयूर ज्वेलर्स
आमचे ध्येय
सर्व मानवी सुखद जीवनात सुवर्ण आनंद आणि उत्सव प्रदान करणे.
सर्व मानवाच्या संपत्तीत सोने व चांदीच्या स्वरुपात वाढ करणे.
अधिक माहिती साठी संपर्क
अशोक चौक, संगमनेर, जि. अ.नगर 422 605 फोन : 02425 225924 | मो.: 93720 12044

CHAITANYA HOSPITAL
चैतन्य हॉस्पिटल (डॉ.जठार)
ताजणे मळा, डॉ. नागरे हॉस्पिटल समोर, नवीन नगर रोड, संगमनेर
☎ 02425 - 221632, 224761, 7038170382
लहान मुलांसाठी कॅशलेस सुविधा उपलब्ध
बालरोग तज्ञ पूर्णवेळ उपलब्ध
डॉ.सौ. उज्वला जठार
एम.बी.बी.एस.,डी.सी.एच. बालरोगतज्ज्ञ
उपलब्ध कॅशलेस सुविधा
• एम.डी. इंडिया हेल्थ केअर सर्व्हिस प्रा. लि. (TPA) • स्टार हेल्थ अलाईड इन्शुरन्स कंपनी लि. • मॅक्स बुपा हेल्थ इन्शुरन्स कंपनी लि. • पॅरामाउंट हेल्थ केअर सर्व्हिसेस (TPA) • विडाल हेल्थ केअर टि.पी.ए. प्रा.लि. • इरीसन टि.पी.ए. हेल्थ केअर प्रा.लि. • रिलीगर हेल्थ इन्शुरन्स कंपनी प्रा.लि. • फॅमिली हेल्थ प्लॅन (FHPL TPA) • आय.सी.आय.सी.आय.लोंबार्ड हेल्थ केअर इन्शुरन्स • रिलायन्स जनरल इन्शुरन्स
• बजाज अलियांज जनरल इन्शुरन्स कंपनी • युनायटेड हेल्थ पारेख लि. • चोलामंडलम हेल्थ इन्शुरन्स कंपनी प्रा.लि. • मेडीअसिस्ट हेल्थ इन्शुरन्स टि.पी.ए. • एच.डी.एफ.सी. अर्गो जनरल इन्शुरन्स • हेल्थ इंडिया टी.पी.ए.प्रा.लि. • अपोलो म्युनिच हेल्थ इन्शुरन्स • मेडसेव टी.पी.ए. प्रा.लि. • दि ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी • दि न्यु इंडिया इन्शुरन्स कंपनी
• युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी • नॅशनल इन्शुरन्स कंपनी • SBI जनरल इन्शुरन्स • टाटा AIG जनरल इन्शुरन्स • इस्ट वेस्ट हेल्थ इन्शुरन्स (TPA) • HDFG ERGO जनरल इन्शुरन्स • निवा Bupa (Max Bupa) इन्शुरन्स कंपनी • केअर हेल्थ (रेलिगेअर) इन्शुरन्स • Gio Digit हेल्थ इन्शुरन्स कंपनी • हेल्थ इन्शुरन्स (TPA)
Critical Care I Dialysis I C.T.Scan I Pathology Lab I Cashless Companies Available

काजळे ज्वेलर्स
मार्केट मधील सर्वात कमी भाव
सोने विमा संरक्षण उपलब्ध
सुवर्ण बचत भिशी उपलब्ध
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर 9601222777, 9615222777

SALE 25 TO 50%* OFF
लग्नबस्त्यासाठी खास व्यवस्था...
भंडारी क्लॉथ सेंटर | सिल्क अँण्ड सारीज
मनासारखी खरेदी आणि भरपूर फायदा देणारा सेल
(संपूर्ण ए.सी. शोरुम)
मेनरोड कॉर्नर, बाजारपेठ, संगमनेर

सुविचार : सर्वांनी एकत्र श्रम केल्याने कठीण काम हलके होते.

## आमदारांची दाराराशाही

‘आकाशवाणी’ आमदार निवास उपाहारगृहात निकृष्ट भोजन मिळत असल्याचा आरोप करीत शिवसेना शिंदे ’गटाचे बुलडाण्याचे आमदार संजय गायकवाड यांनी कर्मचाऱ्याला बेदम मारहाण केली. या मारहाणीची दखल विधान परिषदेचे सभापती आणि विधानसभा अध्यक्षां घ्यावी आणि योग्य ती कारवाई करावी, अशी विनंती मुख्यमंत्री फडणवीस यांना विरोधकांनी केली आहे. तसेच आपल्या पक्षाच्या आमदाराची उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही कानउघाडणी केली. आमदार गायकवाड यांनी आमदार निवास उपाहारगृहातून रात्री भोजन मागविले होते. भोजनातील डाळ निकृष्ट दर्जाची आणि दुर्गंधीयुक्त होती. त्यामुळे संतापलेले गायकवाड बनियन आणि टॉवेलवरच उपाहारगृहात आले आणि डाळीचा वास घेऊन बघ, असे म्हणत कर्मचाऱ्याला गुद्दे लगावण्यास सुरुवात केली. यापूर्वी तीनवेळा असाच प्रक र घडला होता, त्यावेळी मी मालकाला समज दिली होती, असा दावाही गायकवाड यांनी केला. आमदार गायकवाड यांनी केलेल्या मारहाणीची चित्रफीत समाजमाध्यमात प्रसारित झाल्याचा मुद्दा शिवसेना ठाकरे गटाचे आमदार अनिल परब यांनी विधान परिषदेत विशेष सूचनेद्वारे उपस्थित केला. आमदार गायकवाड यांनी बनियन आणि टॉवेल गुंडाळून या कर्मचाऱ्यांना केलेली मारहाण गंभीर असून, त्यांच्यावर कारवाईची मागणी केली. मारहाणीची कृती भूषणावह नाही. आमदार म्हणून आपली सर्वांचीच प्रतिष्ठा मलिन होते. आमदार निवासात सोयी चांगल्या नव्हत्या, स्वच्छता नव्हती, भोजनाला दुर्गंधी येत होती, अशा स्वरूपाच्या तक्रारी असतील तर त्या सोडविण्याचा मार्ग वेगळा आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. आमदार संजय गायकवाड आणि वादाची एक परंपराच आहे असे दिसते. यापूर्वी स्वातंत्र्यवीर सावरकरांवर केलेल्या विधानावरून काँग्रेसनेते राहुल गांधी यांची जीभ छाटणाऱ्याला ११ लाखांचे बक्षीस देण्याची घोषणा आमदार गायकवाड यांनी केली होती. त्रिभाषा सूत्रावरून ठाकरे बंधूंवर टीका करताना छत्रपती संभाजीराजे १६ भाषा शिकले, मग ते मूर्ख होते का? असे विधान गायकवाड यांनी केले होते. यावरून टीका होताच त्यांनी दिल व्यक्त केली होती. सरकारमधील माजलेला आमदार बनियन, टॉवेलवर येऊन एका गरीब कर्मचाऱ्याला मारहाण करतो. आमदारांनी कसे राहावे याचे काही संकेत आहेत की नाही? हे गल्लीतले लोक आहेत का? सरकारच्या प्रतिमेला यामुळे बट्टा लागतो आहे, त्यांचा बंदोबस्त करा अशी मागणी परब यांनी केली. अशा लोकांचा तुम्ही पाठिंबा घेणार का? त्यांच्या पाठिंब्यावर सरकार चालवणार का? अशा प्रश्नांचा मारा परब यांनी केला. आमदार निवासाच्या कॅन्टीनमधून शिळे, वास येणारे वरण आमदार गायकवाड यांना देण्यात आले आणि गायकवाड संतापले. आमदारांना शिळे वरण दिले म्हणून इतका राडा झाला पण मग मुलांच्या वसतिगृहांमध्ये मुलांना दिल्या जाणाऱ्या अन्नात अळ्या, किडे, पाल, साप, उंदीर, झुरळे, बेडूक असे नानाप्रकार सापडतात, त्यावर कधी कुण्या आमदाराने मारह केल्याचे उदाहरण आढळत नाही. गरीब विद्यार्थ्यांना सकस आहार मिळू नये असेच आमदार मंडळींना वाटते का? आमदार गायकवाड यांना निकृष्ट दर्जाचे जेवण दिले म्हणून त्यांनी कॅन्टीनच्या कर्मचाऱ्याला मारहाण केली आणि लगेच त्याची दखल घेतली गेली. एफडीआयची टीम कॅन्टीनमध्ये पोहोचली आणि कॅन्टीन सील करण्यात आली. याचा अर्थ मारहाण हाच न्यायाचा मार्ग म्हणावा काय? एखाद्या सामान्य माणसाने अशी तक्रार केली असती तर एफडीआयने त्याची दखल घेतली असती काय? एफडीआयने उपाहारगृहचालकाचा परवाना निलंबित केला आहे परंतु कर्मचाऱ्यांना मारहाण करणाऱ्या आमदार गायकवाड यांच्याविरोधात सरकारने कोणतीही कारवाई केलेली नाही. म्हणजे सरकारने एक प्रकारे आमदाराच्या चुकीच्या वर्तनावर पांघरूणच घातले आहे. ठाकरे गटाचे नेते भास्कर जाधव म्हणाले, कर्मचाऱ्यांना मारहाण करणारे आमदार संजय गायकवाड यांच्या विरोधात काहीही कारवाई नाही, पण उपाहारगृहचालकाचा परवाना निलंबित करून सरकारने चोर सोडून संन्याशाला फाशी देण्याचा प्रकार केला आहे. असेच म्हणावे लागेल. आमदार निवासातील अन्नपदार्थाचा दर्जा चांगला नसल्यास लेखी तक्रार करता आली असती. मारहाण करणाऱ्याच्या विरोधात काही कारवाई नाही. यावरून कायदा हातात घेण्याची गायकवाड यांना मुभा देण्यात आली होती का असा सवाल काँग्रेस विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केला. मारहाण होऊनही संबंधित कर्मचारी अथवा उपाहारगृहाच्या व्यवस्थापकाने पोलिसांत तक्रार दाखल केली नाही. मारहाण करणाऱ्या आमदार गायकवाड यांच्या विरोधात गुन्हा दाखल झालेला नाही. तक्रारच नाही तर गुन्हा कुठून दाखल करणार असे पोलिसांचे म्हणणे आहे. संसद, विधिमंडळ ही लोकशाहीची पवित्र मंदिरे मानली जातात. याच सभागृहातील लोकप्रतिनिधी देशाचा, राज्याचा कारभार चालवण्यासाठी नियम व कायदे करतात, लोकशाहीचे पावित्र्य जपतात, कायद्याचे राज्य राबवतात. जनतेचे प्रतिनिधी समाजाला दिशा देण्याचे, समाज घडवण्याचे कार्य करतात. म्हणूनच त्यांना विशेष अधिकार, वेतन, भत्ते, सोयी- सुविधा दिल्या जातात. मान-सन्मान दिला जातो. या लोकप्रतिनिधींचे चारित्र्य चांगले असावे अशी जनतेची अपेक्षा असते. परंतु अलिकडे काही वर्षांपासून राजकारणात भ्रष्ट, गुंड प्रवृत्तीची घुसखोरी झाली आहे. अशा प्रवृत्तींना राजकीय राजाश्रय मिळाला आहे. त्यामुळे कायदेमंडळाचे पावित्र्य राखले जात नाही. सत्ता आणि अधिकाराची नशा डोक्यात गेल्याने लोकप्रतिनिधीच कायद्याचे उल्लंघन करू लागले आहेत. अशा प्रवृत्तींना वेळीच आळा घातला गेला पाहिजे.

# माणसं नेहमी असं का वागतात ?





आस्वाद...
संदीप वाकचौरे

माणसं नेहमी असं का वागतात ? असा प्रश्न अनेकदा माणसांना पडतो. या प्रश्नांच्या उत्तराचा शोध घेताना, माणसं जे काही वागतात तो त्यांच्या अनुभवातून आलेले नंतरचे शहाणपण असते. खरंतर माणसांच्या समूहामध्ये कोणीही माणसं वाईट वागत नाही. . मात्र माणस जे काही वागतात आणि जे काही अनुभवाला येते,त्याबददल मानसशास्त्रांनी अनेकदा अभ्यास केला आहे. परवा माझा एक अत्यंत चांगला मित्र आहे. त्याच्याकडे गप्पा मारत बसलो आहे. त्यादरम्यानत्याला गावातील एका समूह सदस्यांनी फोन करून आम्हाला कार्यक्रमासाठी एक वक्ता हवा आहे असे सांगितले. मात्र ते ऐकल्यावर या गडयाने स्पष्ट शब्दात नकार दिला. खरंतर याचा संपर्क मोठा होता. अनेक वक्ते त्याचे मित्र होते. गावातील लोकांनी त्याला जो वक्ता सुचवला होता तो देखील याचा मित्र होता. याने कोणाही वक्त्याला फोन केल्यावर तो वक्ता नाही म्हणण्याची शक्यता नाही. तरीपण याच्या नकाराचे कारण काय बर असाव? असा मनात प्रश्नांचा कल्लोळ उभा होता. मला या मागील कारण काय ? याची उत्सुकता होती. मगमीच त्याला विचारले, काय रे का बरं त्यांना नाही म्हणून सांगितले? तो म्हणाला,अलिकडे असं काही वक्ता ठरवून देण्याचा काम मी पूर्णतः बंद केले आहे. पूर्वी अनेकांना असे वक्ते ठरवून देण्यासाठी मी मध्यस्ती केली आहे. मात्र त्यातून मी अनेक गोष्टी शिकलो आहे. लोक जसे वागतात त्याचा फटका आणि झटका आपल्याला बसतो. . अनेकदा आर्थिक फटका बसतो ते जरी खरे असले,तरी त्यापेक्षा होणारा मानसिक त्रास अधिक असतो.

तर तो सांगू लागला. एकदा एक कार्यक्रम गावच्या लोकांना ठरून दिला. साहित्याच्या क्षेत्रात मोठे नाव असलेला वक्ता त्यांना हवा होता. त्या नावासाठी ते लोक अत्यंत आग्रही होते. मग मी संबधित लेखकाला फोन लावला. कार्यक्रमाविषयी सर्व सांगितले. तारीखही सांगितली. त्यादिवशी त्यांना दुसरी तारीख आहे असे त्यांनी सांगितले. मग त्यांना अधिक आग्रह केला. त्यांनी पूर्वीच्या तारखेत बदल करून आम्ही दिलेल्या तारखेच्या कार्यक्रमाला येण्याचे मान्य केले. मग त्यांना कार्यक्रमाची बिदागी किती असेल ?असे सर्वांच्या समोर स्पिकर फोन ठेऊनविचारले,तर त्यांने पाच हजार रूपये सांगितले. तो म्हणाला तुझे गाव आहे आणि त्यात तू फोन केला आहे म्हणून ही कमी रक्कम सांगितली. फोन सुरू असताना गावच्या लोकांना विचारले हे तुम्हाला परवडणारे आहे का ?तरते तात्काळ हो म्हणाले. त्यानंतर कार्यक्रमाची तारीख जवळ येत होती. त्याप्रमाणे मी वक्त्यांना फोन करून पुन्हा पुन्हा आठवण करून देत होतो. कारण त्यांचे येणे हे गावच्या लोकांसाठी महत्त्वाचे होते. त्यापेक्षा तेमाझे मित्र आहे, म्हटल्यावर आपल्या इज्ज़तीचा प्रश्न त्यामागे होता. ते यावेत म्हणून पुन्हा पुन्हा प्रयत्न करणे मलाही अपेक्षित होतेच. कार्यक्रम एका दिवसावर आलेला असताना देखील संयोजकांचा फोनही नाहीआणि साधी चौकशी देखील नाही. त्यामुळे मी चिंतेत होतो. पण तारीख तर गावाच्या लोकांच्या समोर ठरली होती. त्यामुळे कार्यक्रम निश्चित आहे असे समजून मी आदल्या रात्री देखील वक्त्यांना केव्हा निघणार ?किती वाजेपर्यंत येणार?नाष्टा करायला या,मी वाट पाहतो असे सांगून फोन ठेवला आणि रात्री झोपलो. सकाळी नऊचा कार्यक्रम होता. मी राहत असलेल्या शहारापासून माझ्या गावचे अंतर किमान अर्धातासाचे अंतर होते. मग वक्ता सकाळी आठ वाजता घरी आले,घरी चहापान,नाष्टा करून अर्धातासात घर सोडले. मनात कार्यक्रम विषयी शंका होती. कार्यक्रम आहे की नाही ?अशी मनात शंका होती. विचार सुरू असेपर्यंत नऊ वाजता गावात प्रवेश केला. गावात ढोल,लेझीम वाजत होते. तो आवाज दूरवरून कानावर आला होता. त्या आवाजाने मनातील असलेली शंकेची पाल काहीशी दूर झाली. मात्र खात्री झाली नव्हती. अखेर गावात प्रवेश केला आणि संयोजक मंडळी दिसली. आम्ही गाडीतून खाली उतरलो. . मग त्यांनी आम्हाला हात जोडून नमस्कार केला. मग मी देखील निश्वास सोडला. ठरल्याप्रमाणे कार्यक्रम आहे. याची खात्री झाली.

मिरवणूकीतील एकजन आमच्या सोबत आला. आपण चहा घेऊ असे म्हणून तो गावातील एका हॉटेलमध्ये चहासाठी घेऊन गेला. त्यांना मोठया फुशारकीने चहाची ऑर्डर दिली. चहावाल्याने चहाचा ग्लासलगेच आमच्या समोर ठेवला. समोर ठेवलेल्या ग्लासातील चहाचा रंग बरेच काही सांगून जात होता. पण आता समोर आला आहे तर प्यावा लागणार होता. मग चहाचा कप तोंडाजवळ नेला, तर चहा उकळून त्याचा विशिष्ट स्वरूपाचा वास येत होता. त्याचा रंगाचा प्रवासही काळ्या रंगाचे दिशेने सुरू झाला होता. चहामध्ये साखरेची पूर्णतः गोडी उतरली होती. साखरेपेक्षा चहा गोड वाटावा अशी परीस्थिती निर्माण झाली होती. पण पर्याय नव्हता. तो चहा घशाच्या खाली लोटला आणि पटकन तेथून उठणे पसंत केले. कारण पुन्हा कोणी आले आणि चहा घ्या म्हटले, तर पुन्हा पंचाईत व्हायची. त्या भितीपोटी हॉटेलवाल्याला रामराम करत निरोप घेतला आणि निश्चित झालेल्या कार्यक्रमाच्या ठिकाणी पोहचलो. कार्यक्रम जेथे होता तेथे एका सहकारी संस्थेचे कार्यालय होते. मग तेथे जाऊन बसलो. . पुन्हा चहा घेणार का ? असा प्रश्न तेथे असलेल्या सेक्रेटरीने विचारला. मग मी आणि वक्त्याने एकमेकाकडे पाहत हसलो आणि हात जोडत, नकोचहा असे सागितले. सुमारे अर्धातासाने मिरवणूक कार्यक्रमाच्या ठिकाणी आली. कार्यकत्यांनी पुढील नियोजनानुसार सर्वांना व्यासपीठावर बसवले गेले. आम्हालाही बोलवण्यात आले. आम्ही व्यासपीठावर पोहचलो. मात्र व्यासपीठावर खुर्च्या कमी आणि बसणारे जास्त अशी परीस्थिती असल्याने तेथे उपस्थित असलेला प्रत्येक जन खुर्चीवर बसण्यासाठी अप्रत्यक्ष चढाओढ करत होता. आम्ही निवांत उभे होतो. अखेर मुख्य संयोजक आले आणि व्यासपीठावर बसलेल्या तथाकथित गाव पुढा-यांना हात जोडत समोर बसण्याची विनंती केली. त्यांने विनंती करूनही बसलेले पुढारी उठण्यासाठीच्या मनस्थितीत नव्हते. त्यांनी अशा नजरेने पाहिले की,आम्हाला तू उठवतो आहे. आता आम्ही पाहून घेऊअशी अप्रत्यक्ष निशब्द धमकी त्यानजरेतून दिली होती, पण आता पाहुणे उभे आहेत,त्यामुळे त्यांना नाईलाज म्हणून त्यांना उठावे लागलेआणि पाहुण्याना खुर्ची मिळाली. कार्यक्रम सुरू झाला.सूत्रसंचालकाने माईक हाती घेतला. कार्यक्रमाची रूपरेषा जाहीर केली. मग दीप प्रज्वलन,प्रास्ताविक,इतरांची भाषणे सुरू होती. समोर बसलेल्या श्रोत्यांचा अंत पाहिला जात होती. प्रास्ताविक हे एक दीर्घ भाषण होते. पाहुण्याचा परिचय करून देणारा असा नमुना होता की,तो जे काही सांगत होता. ते ऐकल्यावर पाहुण्यांना आपण असेच आहोत का ? असा त्यांनाही प्रश्न पडला असावा. . पण कार्यक्रमाला गेले की,पर्याय नसतो. ते ऐकावेच लागते. अखेर पाहुण्यांना भाषणासाठी निमंत्रित केले गेले. त्यांनी बोलण्यास सुरूवात केली. मानधन मिळणार आहेत म्हटल्यावर त्यांना बोलावे लागणार होते. त्यांनी गावाकडच्या लोकांच्या विकेट घेणा-या गोष्टी सांगत त्यांचे दात त्यांच्या तोंडात घातले. हसून हसून लोक बेजार झाले. टाळ्या पडत होत्या. मग माझ्या मनावरील ताण हलका झाला. आपण आणलेल्या पाहुण्याने सभा जिंकली होती. त्यामुळे काय पाहुणे आणले ? असे कोणी म्हणण्याची शक्यता नव्हती. अखेर भाषण संपले. आभार मानण्यासाठी एक जण उभा राहिला. आता दोन मिनिटात भाषण संपेल असे वाटत असताना तसे काही घडले नाही. प्रत्येक वक्ता काय काय म्हटला आहे असा सारांश सांगत आपल्याही भाषणाची हौस त्यांनी आभार मानताना भागून घेतली होती. नाही म्हटले तरी पंधरा मिनेट त्यांने घेतले होते. आता कार्यक्रम संपायला एक वाजला होता.

सर्वजन पुन्हा संस्थेच्या कार्यालयात आले. तेथे पुन्हा चहा घेणार का ? विचारणा झाली. आम्ही नको म्हणून जाण्याची घाई आहे असे सांगितले. मग आम्ही निघालो. एकाने वक्त्याच्या हातात मानधनाचे पाकीट हाती ठेवले आणि आभाराचे शब्द फेकत,जाण्याची अनुमती दिली. आम्ही आमच्या गाडीत येऊन बसलो. . चालकाने गाडी सुरू करून परतीच्या प्रवासाला आरंभ केला. काहीसे पुढे आलो आणि वक्त्याने पाकीट उघडले. पाकीटात ठरलेल्या मानधनापेक्षा एक हजार रूपये कमी होते. वक्त्याने मला त्याची जाणीव करून दिली. मग मी संयोजकाना मी फोन केला. तुम्ही ठरलेल्या मानधनापेक्षा पाकिटात एक हजार रूपये कमी दिले आहेत. असे त्यांना सांगितले. त्यांनी हो का ? असा उलट प्रश्न केला. आता असं करा ,तुम्हीच भराआणि नंतर पाहू असे मला सुचवले. आता वक्ता आपण ठरवला तर ते द्यावेच लागणार होते. मग मी माझ्या खिशात हात घालत त्यांना हजार रूपये दिले आणि पाकीट पुन्हा बंद केले. वक्ता खुश झाला होता. येतांना एका हॉटेल जवळ गाडी थांबवण्याची विनंती केली. तेथे आपण जेवण करू असे सांगितले. अखेर तेथे आम्ही सर्वजन थांबलो. मग जेवणाची ऑर्डर देण्याची विनंती. त्यांनी त्यांच्या पसंतीचे सर्व मेनू सांगितले. गाडीत मित्रांसह पाच जण होतो. आमचे जेवण झाले. बील देऊन पुन्हा घराच्या दिशेने निघालो. प्रवास सुरू झाला. घरी आलो पुन्हा चहापान झाले आणि त्यांना निरोप दिला. मग पुन्हा पंधरा दिवसानी गावी गेलो, तेव्हा पुन्हा एकदा संयोजक भेटलेच. पुन्हा चहापान झाले. पण त्यांनी चुकूनही त्यांनी आपण हजार रूपये कमी दिले. तुम्ही त्यांना दिले. ते आम्ही देतो किंवा कसे ? याबददल एकही शब्द बोलले नाही. मी देखील काहीच न बोलता निरोप घेतला. त्यांनी अगदी व्यवस्थितपणे आपल्याला चुना लावला होता. आपणही चुना लावून घेतला होता. खरंतर हे त्यांनी अगदी प्रामाणिकतेने तुम्ही मानधन द्या असे सांगितले असते,तर मी आनंदाने दिले असते. मात्र असा बेबनाव केला त्याचा अधिक संताप झाला. पण पर्याय नव्हता. हे त्यांने सांगितल्यावर मलाही चिंता वाटत होती. तर तो म्हणाला बसं.तुला आणखी काही गोष्टी सांगतोआणि तो सांगू लागला.

मागे एकदा असाच कार्यक्रम आयोजकांनी मला पाहुणे पाहण्यास सांगितले. त्यांनी सुचवलेल्या पाहुण्यांना कार्यक्रमाला बोलवले. ते कार्यक्रमाला आले. कार्यक्रम छान झाला होता. जेवण झाले आणि पाहुणे निघाले,तरी त्यांच्या मानधनाचा विषय निघेने. अखेर मीच संयोजकाकडे गेलो आणि मानधनाविषयी त्यांना विचारले. तेव्हा ते म्हणाले काय झाले आहे,की आमचे पैशावाला बाहेर गेला आहे. तेव्हा सध्या तुम्ही द्या,मग आम्ही तुम्हाला देतो. आता तर माझाच चेहरा मीच आरशात पाहावा असा झाला होता. मला संताप आला होता,पण माझे भाग्य चांगले होते की,किमान त्यांचे जेवढे मानधन ठरले होते,तेवढे पैस खिशात होते. मी पुन्हा एक पाकिट भरले आणि त्यांच्या हाती टेकवले. त्यांना हसत हसत निरोप दिला. मी पुन्हा पुन्हा विचार करत होते. . ही लोक अशी का वागतात ? मला ते पैसे चक्क तीन चार महिन्यांने मिळाले. . मला वाटले पैसे ज्याच्याकडे होते तो तीन चार महिने बहुतेक तिर्थयात्रेला गेला असावा. एकदा तर एकाने मानधन म्हणून वक्त्याला चेक दिला. तो वक्त्याने बँकेत भरला आणि तो चेक खात्यावर पैसे नसल्याने वटला नाही. वकत्याने त्या बददलची कल्पना दिली. मला खूपच खजील वाटले. आता पुन्हा प्रश्न निर्माण झाला. मग मी संयोजकाना फोन केला,तर ते जणू काहीच झाले नाही असं समजून ,ते म्हणाले, खात्यावर पैसे भरले होते, पण तोवर बँकेत चेक येऊन परत गेला होता. आता असं करा, त्यांना तुम्ही पैसे ऑनलाईन पाठवा. तुम्ही आम्हाला भेटले की,तुम्हाला देतो. अखेर तो आदेश मानून ऑनलाईन पैसे वक्त्याला पाठवले. कारण आपण त्यांची मध्यस्ती करून त्यांना बोलवले होते. आता आपल्या इज्ज़तीचा प्रश्न होता. मात्र ऑनलाईन पैसे पाठवल्यानंतर संयोजकानी ते पैस चक्क एकवर्षाने दिले. हे त्यांचे हे अनुभव ऐकल्यावर त्याने जो निर्णय घेतला. तो कोणालाही पटणाराच होता. माणसं नेमके अशी का वागतात ? याचे उत्तर मिळाले होते. मी त्याला हात जोडत निरोप घेतला. . आणि मनात पुन्हा पुन्हा प्रश्न होता की,माणसं असं का वागतात ?

# भास्करराव दुर्वे यांच्या स्मृती प्रित्यर्थ वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

राष्ट्र सेवादल संगमनेर आयोजित आदिवासी व दलित श्रमिकांचे नेते साथी भास्करराव दुर्वे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ ११ ऑगस्ट रोजी तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती प्रकल्प प्रमुख सोमनाथ मदने यांनी दिली.

एकूण सहा गटांमध्ये या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. इयत्ता तिसरी ते चौथी या गटासाठी आई थकत असेल का? संत गाडगेबाबा, नाती जपू या, शेतकरी जगाचा पोशिंदा, माझ्या कल्पनेतील सुंदर शाळा या विषयावर स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. इयत्ता पाचवी ते सहावीसाठी बाप समजून घेऊ या, शेतीतील विज्ञान आपत्ती व्यवस्थापन एक आव्हान, स्वामी विवेकानंद आणि आधुनिक भारत, व्यसनाधीनता एक शाप. इयत्ता सातवी ते आठवीच्या गटासाठी वाचन संस्कृती व आपण, माझी आवडती महिला संत, निर्भय मी होणार, वसा समतेचा फुले शाहू आंबेडकरांचा, शहीद भगतसिंग यांच्या स्वप्नातील आधुनिक भारत, इयत्ता नववी ते दहावीसाठी संत आणि सामाजिक समतेचा विचार, खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे. समाजवाद शक्य आहे, साहित्य प्रबोधनाचा मार्ग, भारतीय संविधान ७५ वर्ष. इयत्ता इयत्ता अकरावी ते बारावी या गटासाठी शिवाजी महाराजांचे स्वराज्य, असा महाराष्ट्र घडवूया, हुंडाबळी नव्या विवाहाच्या सोहळ्याचे स्वरूप, पर्यावरण स्नेही जगण्याकडे चला, आरक्षण जात आणि सामाजिक समता.

त्याचबरोबर खुल्या गटासाठी आर्टिफिशियल इंटेलिजन्स संधी की संकट, सामाजिक सुधारणा माझा सहभाग, मला समजलेले महात्मा गांधी आई वडिलांचे आई-वडील होऊया, चला जाती धर्मा पलीकडे जगूया या विषयावरती स्पर्धा आयोजित करण्यात आले आहेत. प्रत्येक गटामध्ये रोख रकमेचे पारितोषिक दिले जाणार आहेत. ही सर्व बक्षीस पुस्तकाच्या स्वरूपात असणार आहेत तसेच गटातील विजय स्पर्धकांना स्मृतिचिन्ह दिले जाणार आहेत. स्पर्धकांसाठी अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली आहे. पहिल्या गटासाठी प्रथम क्रमांक पाचशे रुपये तर शेवटच्या गटासाठी प्रथम क्रमांक ११०० रुपयाचे बक्षीस असणार आहे. प्रत्येक गटात एका शाळेची दोन स्पर्धेत सभा घेऊ शकतील प्रत्येक गटातील ५० टक्क्याचा सहभाग हा मुलींचा असणे आवश्यक आहे. स्पर्धा प्रवेशिका व स्पर्धा प्रवेश मूल्य प्रत्येक विद्यार्थ्यास वीस रुपये असणार आहेत.

सदरची स्पर्धा ही काशेश्वर विद्यालय कासारा दुमाला येथे होणार आहे. या स्पर्धेसाठी सर्वोदय नागरी सहकारी पतसंस्था, भास्करराव दुर्वे सहकारी पतसंस्था व आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे यांचे सहकार्य लाभले आहे. तालुक्यातील जास्तीत जास्त शाळांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन भाऊसाहेब शिंदे, राजाभाऊ अवसक व सहकाऱ्यांनी केले आहे.

पान १ वरुन

**रेल्वेमार्गाला समांतर औद्योगिक महामार्गाचा विचार अव्यवहार्य!**

जाणार आहे.

गेल्या जानेवारीत रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी केलेल्या एका वक्तव्यानंतर बहुचर्चीत पुणे-नाशिक सेमी-हायस्पीड रेल्वेमार्गाबाबत साशंकता निर्माण झाली आहे. नारायणगावजवळील खोडद येथे असलेल्या रेडिओ दुर्बिणींना लहरी मिळवण्यात अडसर निर्माण होण्याच्या शक्यतेने रेल्वेमंत्र्यांनी जवळजवळ काम सुरु होण्याच्या स्थितीत पाहचलेला हा प्रकल्पच रद्द करण्याची घोषणा केली होती. या रेल्वेमार्गासाठी तत्पूर्वीच संगमनेरसह पुणे व नाशिक जिल्ह्यातील तालुक्यांमधून थेट खरेदीखतांद्वारे जमीनींचे संपादनही झाले असताना रेल्वेमंत्र्यांचा हा निर्णय वादग्रस्त ठरला. त्याचे सामाजिक आणि राजकीय पडसाद उमटण्यास सुरुवात झाल्यानंतर त्यांनी खोडदला पर्याय निवडण्याची तयारी दाखवल्याने जवळजवळ गुंडाळण्यात आलेल्या रेल्वेप्रकल्पाबाबत मात्र आजही आशा कायम आहेत.

अशास्थितीत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) राज्यातील दळणवळणाची स्थिती सुधारण्यासाठी मोठ्या प्रमाणात रस्त्यांची कामे हाती घेतली असून त्यात पुणे ते नाशिक या दोन महानगरांना जोडणाऱ्या तब्बल २८ हजार ४२९ कोटी रुपये खर्चाच्या पुणे-नाशिक औद्योगिक द्रूतगती महामार्गाचा प्रस्ताव राज्य सरकारला सादर केला होता. त्याला फेब्रुवारी २०२३ मध्ये राज्य शासनाने मंजुरीही दिली. त्यानंतर गेल्यावर्षी शासनाने सदरचा प्रकल्प पुणे-नाशिक सेमी-हायस्पीड रेल्वेमार्गाला समांतर नेता येईल का? याबाबतची चाचपणी करुन सविस्तर अहवाल सादर करण्याच्या सूचना एमएसआरडीसीला दिल्या होत्या.

त्याचा अहवाल नुकसात सादर करण्यात आला आहे. या अहवालात नागपूर-गोवा 'शक्तिपीठ' महामार्गाचा संदर्भ देण्यात आला असून रत्नागिरी-कोल्हापूर महामार्गाला समांतर हा प्रकल्प असल्याने त्याला अनेक गावांतून विरोध होत असल्याचे म्हटले आहे. या पार्श्वभूमीवर प्रकल्पाच्या मूळ संरेखनात बदल योग्य ठरणार नाही. त्याचप्रमाणे रेल्वेमार्गाला समांतर नेण्याचा विचारही तांत्रिक व आर्थिकदृष्ट्या अव्यवहार्य असल्याचे स्पष्ट मत या अहवालातून व्यक्त करण्यात आले आहे. त्यामुळे या प्रकल्पाच्या मूळ प्रस्तावानुसार काम सुरु करण्याची परवानगीही महामंडळाने राज्य सरकारकडून मागितली आहे. या द्रूतगती प्रकल्पामुळे संगमनेर तालुक्याच्या दुष्काळी भागांना संजिवनी मिळणार असून तो नाशिक जिल्ह्यातील निफाड तालुक्यात 'सुरत-हैद्राबाद' द्रूतगती महामार्गाशी जोडला जाईल. त्याद्वारे तालुक्यासह जिल्ह्यासाठी आंतरराज्य दळणवळणाचे प्रवेशद्वारच उघडले जाईल.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या प्रस्तावानुसार सुमारे २१३ किलोमीटर लांबीच्या या रस्त्यात १३३ किलोमीटरचा भाग संपूर्णतः नव्याने (ग्रीन फिल्ड) बांधला जाईल. सहा पदरी द्रूतगती महामार्गामुळे या दोन शहरांमधील अंतर निम्म्याने कमी करुन पाच तासांवरुन अडीच तासांवर आणण्याचा एमएसआरडीसीचा उद्देश आहे. या महामार्गामुळे उद्योग आणि कृषी क्षेत्रातील वाहतूक अधिक सुलभ होईल. पुणे, अहिल्यानगर आणि नाशिक या जिल्ह्यांची दळणवळण व्यवस्था अधिक भक्कम होईल. हा महामार्ग सुरत-हैद्राबाद महामार्गाशी जोडला जाणार असल्याने जिल्ह्यासाठी आंतरराज्य वाहतुकीची कवाडे उघडली जाणार असून अविकसित भागाला त्याचा चांगला फायदा होईल. दोन वर्षांपूर्वी मंजूरी मिळालेल्या या प्रकल्पाच्या भूसंपादनाची प्रक्रियाही सुरु झाली असून महामंडळाने प्रत्यक्ष काम सुरु करण्याची परवानगी मागितल्याने येणाऱ्या काळात संगमनेर तालुक्याला सेमी-हायस्पीड रेल्वेपूर्वीच ग्रीन फिल्ड एक्सप्रेस महामार्ग मिळणार हे निश्चित आहे.

**जवान संदीप घोडेकर यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन**

छत्तीसगड येथे झाली आहे. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, एक मुलगा असा परिवार आहे. दिल्ली येथे कार्यरत असतांना मंगळवारी पहाटे त्यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुःखद निधन झाले. मेजर संदीप घोडेकर बुधवार दि.२ जुलै रोजी संगमनेर मध्ये घोडेकर मळ्यात येऊन आपल्या कुटुंबासह मित्र परिवाराला भेटले होते. मेजर संदीप घोडेकर यांच्यावर आज बुधवारी सकाळी शासकीय इतमामात अंत्यसंस्कार केले जाणार आहेत.

**लाभक्षेत्रात पावसाची पूर्णत : उघडीप!**

वातावरण निर्माण केले आहे. मध्यंतरी काहीकाळ पावसाने दडी मारल्याने चिंताही दाटली होती, मात्र त्यातून सावरल्यानंतर आता जवळजवळ संपूर्ण जिल्ह्यात मान्सूनने विश्रांती घेतल्याचे चित्र दिसत आहे. गेल्या चोवीस तासांचा विचार करता अकोले तालुक्यात अगदीच नगन्य झालेल्या पाऊस वगळता जिल्ह्यात ठणठणात होता.

पाणलोटात पावसाचा जोर वाढल्याने पर्यटकांची संख्याही वाढत आहे. त्यामुळे शेंडी व परिसरातील हॉटेल व्यावसायिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. अधुनमधून धडाधड कोसळणारी सर अशा स्वरुपाचा या भागातील पाऊस अनुभवताना नवखे पर्यटक अचंबित होत आहेत. गेल्या दोन-चार दिवसांत मात्र पाणलोटातही पाऊस मंदावला आहे. मात्र सोमवारी रात्रभर आषाढसरींचा जोर वाढून त्यात सातत्य राहिल्याने भंडारदऱ्यासह मुळाधरणातील आवक वाढली. गेल्या काही दिवसांपासून धरण परिचालन सूचीनुसार भंडारदऱ्याचा पाणीसाठा नियंत्रित केला जात होता.

त्यामुळे सोमवारी रात्रभर कोसळलेल्या पावसाने धरणातील आवक वाढल्यानंतर सध्या सुरु असलेल्या ८४० क्यूसेकच्या विसर्गात वाढ होण्याची अपेक्षा होती, मात्र प्रत्यक्षात तसे घडले नाही. मागील चोवीस तासांत धरणात एकूण ३८९ दशलक्ष घनफूट नवीन पाण्याची आवक झाली. त्यातील ३१८ दशलक्ष घनफूट पाणी धरणातच रोखण्यात आले. तर, सध्या विद्युतगृह सुरु असल्याने त्यासाठी सुरु असलेला ८४० क्यूसेकचा विसर्ग मात्र तसाच ठेवण्यात आला. त्यामुळे भंडारदऱ्याच्या पाणीसाठ्यात वाढ झाली आहे. निळवंडे धरणातही या कालावधीत ११३ दशलक्ष घनफूट पाणी आले. त्यातील ३५ दशलक्ष घनफूट पाणी प्रतिसेकंद ३०० क्यूसेक वेगाने प्रवरापात्रात सोडले गेले व ७८ दशलक्ष घनफूट पाणी अडवण्यात आले.

मुळा खोऱ्यातील पावसालाही सोमवारी रात्री जोर चढल्याने मुळेच्या पात्राचा फुगवटा किंचित वाढला आहे. आज सकाळी कोतुळनजीकच्या मुळानदीतून ३ हजार २१२ क्यूसेक पाणी वाहत होते. तर, आढळा नदीतून अवघ्या नऊ क्यूसेकचा विसर्ग सुरु असून म्हाळुंगी नदीचा प्रवाह पूर्णतः थांबला आहे. सध्या ओझरच्या बंधाऱ्यावरुन प्रवरापात्रात ७५२ तर, कालव्यांद्वारे १३२ क्यूसेक, मुळा धरणातून नदीपात्रात एक हजार क्यूसेक तर, कालव्यांद्वारा ४५० क्यूसेक पाणी सोडले जात आहे.

गेल्या चोवीस तासांत रतनवाडीत ८९ मि.मी., घाटघर ७७ मि.मी., पांजरे ४३ मि.मी., भंडारदरा २० मि.मी., निळवंडे ०६ मि.मी. व अकोले दोन मि.मी. पावसाची नोंद झाली. आज (ता.१५) सकाळी सहा वाजता मुळा धरणाचा पाणीसाठा १८ हजार २२६ दशलक्ष घनफूट (७०.१० टक्के), भंडारदरा ८ हजार १६९ दशलक्ष घनफूट (७४ टक्के), निळवंडे ७ हजार ११७ दशलक्ष घनफूट व जायकवाडी धरणाचा पाणीसाठा (एकूण) ८४ हजार ६३६ दशलक्ष घनफूट (८२.४० टक्के) व (उपयुक्त) ५८ हजार ५७० दशलक्ष घनफूट (७६.४० टक्के) इतका होता.

# तहसीलदार डॉ.मोरे यांच्यावर कारवाई करण्याची ग्राहक पंचायतीची मागणी

**नायक वृत्तसेवा, अकोले**



अकोले तालुक्यामध्ये वाळू तस्करी, रेशन घोटाळा, दाखले वेळेत न मिळणे शेतकऱ्यांना अनेक कामासाठी चकरा मारायला लागणे, अनेक कामासाठी आर्थिक देवाण-घेवाण यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. तहसीलदार डॉ.सिद्धार्थ मोरे यांचा प्रशासनावर वचक राहिला नसल्याने त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी असा ठराव ग्राहक पंचायतच्या तालुका बैठकीमध्ये घेण्यात आला. यासाठी महसूल मंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे व जिल्हाधिकारी यांना समक्ष भेटून कारवाईची मागणी करणार असे ठरले.

अकोले येथील शासकीय विश्रामगृहावर बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीच्या अध्यक्षस्थानी प्रा. सुनील शिंदे होते. यावेळी ग्राहक पंचायत जिल्हा उपाध्यक्ष, भाजपचे तालुका सरचिटणीस मच्छिंद्र मंडलिक, तालुका अध्यक्ष दत्ता शेणकर, कार्याध्यक्ष महेश नवले, खरेदी विक्री संघाचे व्हा. चेअरमन माधव तीटमे, भाजपा जिल्हा संयोजक भाऊसाहेब वाकचौरे, वसंत बाळासराफ, बबन तिकांडे, भाऊसाहेब वाकचौरे, साहेबराव दातखिळे, राजेंद्र घायवट, बाळासाहेब बनकर, राजेंद्र गवांदे, शारदा शिंगाडे, रामदास पवार, प्रतिभा सूर्यवंशी, दत्ता ताजणे, शारदा शिंगाडे, ज्ञानेश पुंडे, दत्ता शेटे, कैलास तळेकर आदी उपस्थित होते.

# वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप



**नायक वृत्तसेवा, साकुर**

संगमनेर तालुक्यातील मांडवे बुद्रुक येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष ॲड. अमित कोंडीभाऊ धुळगंड यांचे मोठे बंधू अमोल कोंडीभाऊ धुळगंड, यांच्या वाढदिवसानिमित्त येथील जिल्हा प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य आणि खाऊचे वाटप करण्यात आले.

अमोल धुळगंड यांनी वाढदिवसानिमित्त होणाऱ्या अनावश्यक खर्चाला फाटा देत येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांना शालेय साहित्य बरोबर खाऊचे वाटप केल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसाडून वाहत होता. यावेळी दत्तू बर्डे, सलीम शेख, वामन धुळगंड, अलीम शेख, सुनील कुटे, अजय बिडकर, संतोष बिडकर, दौलत माळी, आवेज आतार यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


**जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मालदाड , ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर**

**जाहीर लिलाव**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मालदाड , ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर येथील मोडकळीस आलेल्या एका खोलीचे स्क्रॅप मटेरियलचा (दगड, पत्रा, लाकूड, शहाबादी फरशी, दरवाजे, खिडक्या, जे हुक, लोखंडी पाईप, अँगल) जाहीर लिलाव दि. 17 /07 /2025 रोजी सकाळी 9.00 वाजता जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मालदाड , ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर येथे करण्यात येणार आहे. तरी लिलावात भाग घेऊ इच्छिणाऱ्यांनी वेळेवर उपस्थित राहावे. लिलावाच्या अटी व शर्ती शाळेच्या कार्यालयात लिलावाच्या वेळी पाहावयास मिळतील. लिलावाचा अंतिम निर्णय शाळा व्यवस्थापन समिती, जि. प. प्राथ. शाळा, मालदाड आणि पंचकमिटी यांचा असेल. लिलावात भाग घेऊ इच्छिणाऱ्यांना अनामत रक्कम 10 हजार रुपये भरावी लागेल. संपर्क क्र. 9579380381,9421982775

**अध्यक्ष व सचिव**
शाळा व्यवस्थापन समिती मालदाड , ता. संगमनेर, जि.अहिल्यानगर



**गाळा भाड्याने देणे आहे**

वंदन मेन्स पार्लर,मेन रोड, संगमनेर.
१३/१०, R/C बांधकाम असलेला गाळा त्वरित भाड्याने देणे आहे.
इच्छुकांनी संपर्क साधावा.
मो. ९४ २२ २३ ८६ १६, ९८ ५० ०४ ४४ ८७.



**पाहिजेत**

दुकान कामासाठी
लेडीज, जेन्ट्स पाहिजेत
अनभुवीस जास्त प्राधान्य
आकर्षित पगार दिला जाईल.
**भंडारी सिल्क ॲण्ड सारीज संगमनेर**
मो.बा.७६६६८०५८१९



**पाहिजेत**

जेन्ट्स सेल्समन - २ जागा
लेडीज सेल्समन - ३ जागा
कॉम्पुटर ऑपरेटर - २ जागा
**सारिका ड्रेसेस**
बाजार पेठ ,संगमनेर
संपर्क- ९८२२३५८३३५


अहमदनगर जिल्हा पतसंस्थांचे सहकारी फेडरेशन मर्या., अ.नगर
दूसरा मजला, व्यापारी संकुल, महात्मा फुले चौक, मार्केट यार्ड, ता. जिल्हा अ.नगर. 414001
(0241)2326914 , Email - ahmednagarfederation@gmail.com

जा .क्र. पतसंस्था/फेडरेशन 2038/2025 दिनांक: 26/06/2025

**स्थावर मालमत्ता ताबा घेण्याबाबतची नोटीस**
नमुना 'झेड'
(नियम 107पोट-नियम (11 (ड-1) पहा.)

ज्याअर्थी खाली सही केलेला वसुली अधिकारी :- संग्राम नागरी सहकारी पतसंस्था मर्या., संगमनेर, ता. संगमनेर, जिल्हा, अ.नगर व्दाराः अहमदनगर जिल्हा पतसंस्थाचे सहकारी फेडरेशन मर्या, अ. नगर महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, 1961 अन्वये असुन मागणीची नोटीस ऋणको यांना देऊन नोटीशीमध्ये नमुद केलेली रक्कम सदर नोटीस मिळाल्याच्या दिनांका पासुन आणि ऋणको याने रक्कम जमा करण्यास कसुर केली आहे. खाली सही करणा-याने जप्तीची नोटीस दिली असुन, पुढे निर्दिष्ट केलेली मालमत्ता जप्त करण्यात आली आहे.

ऋणकोने रक्कम जमा करण्यास कसुर केल्यामुळे ऋणकोला याप्रमाणे नोटीस देण्यात येत आहे आणि सर्व नागरिकांना खाली निर्दिष्ट केलेल्या मालमत्तेचा खाली सही करणा-याने त्याला /तिला महाराष्ट्र सहकारी संस्था नियम . 1961 मधील नियम 107 (11(ड-1) अन्वये दिलेल्या अधिकारानुसार दि. 25/06/2025 दिवशी ताबा घेतला आहे. विशेष करून ऋणकोला आणि सर्व नागरिकांना याव्दारे सावध करण्यात येत आहे की, मालमत्ते संबंधी कोणताही व्यवहार करू नये. आणि व्यवहार केल्यास :- संग्राम नागरी सहकारी पतसंस्था मर्या., संगमनेर, ता. संगमनेर, जिल्हा, अ. नगर यांच्या बोजाची रक्कम आणि होणारे व्याज याला अधीन राहावे लागेल.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

| क्रं. | थकबाकीदारांचे नाव | थकबाकी रक्कम | नोटिस दिनांक | गावाचे नाव | गट क्रमांक भुमापन क्र. | क्षेत्र हे आर चौ मी | पूर्व पश्चिम दक्षिण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | कर्जदार - दिनेश नंदकिशोर लाहोटी करिता<br>जामि - पंढरीनाथ शिवराम घाणे यांची मिळकत | दावा रक्कम रु.42089/- दि.30/09/2005 पासुन 16% व्याज +इतर खर्च | मागणी नो. दि. 03/03/2006 जप्ती नो.दि. 25/08/2025 | पिंपळगाव देपा ता. संगमनेर | 53/2 | 1.40 | मुळ नकाशा प्रमाणे |
| 2. | कर्जदार -मे. बालाजी डिस्ट्रीब्युटर्स ,प्रो. सुनिल यशवंत जोर्वेकर करिता<br>जामि - सुभाष भगवानराव यांची मिळकत<br>जामि - प्रल्हाद कचेश्वर जोर्वेकर यांची मिळकत | दावा रक्कम रु.164808/- दि.30/06/2005 पासुन 18% व्याज + इतर खर्च | मागणी नो.दि. 07/01/2006 जप्ती नो.दि. 03/06/2024 | सुकेवाडी<br>सुकेवाडी ता. संगमनेर | 161/1<br>158/16/1<br>159/1 पैकी<br>163/4 | 0.29<br>0.38<br>1.96 पैकी<br>0.69 | मुळ नकाशा प्रमाणे |
| 3. | कर्जदार - भुटटो महंमदअली रंगरेज करिता<br>जामि - बाळासाहेब नारायण मंडलिक यांची मिळकत | दावा रक्कम रु.15473/- दि.01/07/2007 पासुन 15% व्याज +इतर खर्च | मागणी नो.दि. 05/12/2007 जप्ती नो.दि. 20/07/2013 | संगमनेर ता. संगमनेर | सि.स.नं. 3440 | 15.70 चौमी | मुळ नकाशा प्रमाणे |

दिनांक 15/07/2025
स्थळ-अ. नगर

जे.डी. काळे
विशेष वसुली व विक्री अधिकारी
अहमदनगर जिल्हा पतसंस्थाचे सहकारी फेड. मर्या., अ.नगर

# सोमेश्वर मित्र मंडळाच्या पदाधिकाऱ्यांचा माजी मंत्री थोरात यांच्या हस्ते सत्कार

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

शहरातील मानाचा गणपती असलेल्या रंगार गल्ली येथील सोमेश्वर मित्र मंडळाच्या कार्यकारणीवर नवीन पदाधिकाऱ्यांची निवड झाली असून अध्यक्ष रोशन आमले यांच्यासहित नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यशोधन जनसंपर्क कार्यालय येथे सोमेश्वर मित्र मंडळाच्या नवीन कार्यकारिणीचा सत्कार माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी युवक काँग्रेसच्या अध्यक्षा डॉ. जयश्री थोरात, शहराध्यक्ष सोमेश्वर दिवटे, विश्वास मुर्तडक, मार्गदर्शक किशोर पवार, आप्पासाहेब खरे, मुकुंद गरुडकर, कैलास लोणारी, अनिल काळन, अभिजीत पाटणकर उपस्थित होते.

नवीन कार्यकारणीमध्ये अध्यक्षपदी रोशन अनिल आमले, उपाध्यक्षपदी अक्षय ढोरे व अमोल डुकरे, सचिव संकेत राजेंद्र काजळे, खजिनदार देवेंद्र काळे, कैलास बोरसे, सदस्य शुभम आमले, योगेश काजळे, वैभव आमले, प्रसाद आमले, रोहित बोरसे, श्रीराज गोंगे, शुभम परदेशी, अमित बोरसे, कुंजन कांबळे, कमलेश असावा, निखिल डुकरे, सोनू भिंगरे, मयूर जाधव, साईराज शेरे, साईराज पाटणकर, कृष्णा असावा, शंतनू नावले, ओम परदेशी, परिश्रम काळंन, सार्थक मिसाळ, विनायक भोईर, स्वाती मिसाळ, ओम कांबळे, अकबर चौधरी, नरेंद्र बोरसे, सचिन लोणारी यांचा समावेश आहे.









'बांधिलकी जनहिताची नायक' हे दैनिक मालक, मुद्रक व प्रकाशक घनश्याम हनुमानप्रसाद तिवाडी यांनी विकास प्रिंटींग अॅण्ड कॅरिअर्स प्रा.लि., प्लॉट नं. ३२, एम.आय.डी.सी. सातपूर, नाशिक येथे छापून ऐश्वर्या कॉम्प्लेक्स, तळमजला, गाळा क्रमांक बी-१०, बस स्टँडजवळ, संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर - ४२२ ६०५ येथे प्रसिद्ध केले. संपादक : गोरक्षनाथ भिमाजी मदने, कार्यकारी संपादक : श्याम तिवारी.

**पाहिजेत**

**धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल**

| अ.नं | पद | जागा |
|---|---|---|
| १ | R.M.O | २ |
| २ | Bsc Nursing | २ |
| ३ | Driver Plus Receptionist | २ |
| ४ | Maintanance | २ |
| ५ | Data opretor (MJPJAY and cashless department) | २ |

पत्ता: ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ. नगर
मो. ७४९९१७६८६४, ९४२०८५४३०६
फोन:०२४२५-२२७५७५/२२७५७४



बांधिलकी जनहिताची

# नायक

MAHMAR/2018/75654



जिथे काळजी आणि उपचार एकत्र येतात...
ताम्हाणे हॉस्पिटल
इंदिरानगर, गल्ली नं. १०, संगमनेर
डॉ. विशाल ताम्हाणे (एम.एस.-शल्य) कन्सल्टंट जनरल अ‍ॅण्ड लेझर सर्जन
डॉ. रुपाली विशाल ताम्हाणे (बी.ए.एम.एस.) स्त्रीरोग / प्रसुती चिकीत्सक
Help Line : 7219 100 100
मेडिसिन ▪ सर्जरी ▪ लेझर सेंटर ▪ स्त्रीरोग-प्रसुति ▪ मुळव्याध-भगंदर-फिशर





शेरवानी शानदार.. रुबाब दिमाखदार..
लग्न म्हणजे बस्ता. बस्ता म्हणजे राजेन्द्र.





१९५९ पासून विश्वासाची सार्थ परंपरा...
राजेन्द्र
मेन रोड, संगमनेर. फोन : 02425-225740, 7901031155


# बोगस डॉक्टरांना आळा घालण्यासाठी नव्या कायद्याची गरज : आ.सत्यजीत तांबे

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

राज्यात बोगस डॉक्टरांचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे. विशेषतः ग्रामीण, आदिवासी पाडे आणि शहरी झोपडपट्ट्यांमध्ये बोगस डॉक्टरांचा सुळसुळाट वाढल्याने नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर, बोगस डॉक्टरांना प्रतिबंध घालण्यासाठी नवीन आणि अधिक प्रभावी कायदा तयार करण्याची आवश्यकता असल्याचे आमदार सत्यजीत तांबे यांची विधान परिषदेत अधोरेखित केले. यावर आरोग्य राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी समिती नेमण्यात येईल असे सांगत आ. तांबे यांच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद दिला.



नाशिक जिल्ह्यातील बागलाण तालुक्यातील मोसम परिसरात कार्यरत वैद्यकीय संघटनांनी अशा बोगस डॉक्टरांविरोधात आवाज उठवला आहे. या भागात 'महाराष्ट्र रुरल हेल्थ असोसिएशन' नावाची एक संस्था चालवली जाते. या संस्थेद्वारे बनावट डॉक्टरांना बोगस सर्टिफिकेट वाटप केले जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. ही संस्था स्वतःला वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशनशी संलग्न असल्याचा खोटा दावा देखील करत आहे. राज्यात बोगस डॉक्टरांवर कारवाई करण्यासाठी पोलिसांना अधिक अधिकार देण्याची मागणीही आ. तांबे यांनी केली. यासाठी पोलिस महासंचालक, वैद्यकीय सचिव आणि संबंधित खात्यांतील वरिष्ठ अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक बोलावण्याची आवश्यकता आ. सत्यजीत तांबे यांनी मांडली.

तत्कालीन आरोग्यमंत्री गिरीश महाजन यांनी डिसेंबर २०२२ च्या अधिवेशनात बोगस डॉक्टर प्रतिबंधक कायदा आणण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, आजतागायत तो कायदा अस्तित्वात आला नाही. सध्याचा कायदा प्रभावी नसल्याने त्यात सुधारणा करण्याची निकड निर्माण झाली असल्याचे आमदार सत्यजीत तांबे यांनी म्हटले.

राज्य शासनाने बोगस डॉक्टर ओळखण्यासाठी क्यु आर कोड प्रणाली लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. ही प्रणाली केवळ शहरी भागापुरती मर्यादित न ठेवता गावपातळीवर तसेच आदिवासी पाड्यांमध्ये देखील बंधनकारक केली जाणार आहे. त्यामुळे कोणताही डॉक्टर हा अधिकृत आहे की बोगस, याची तात्काळ शहानिशा करता येईल. त्याचबरोबर बोगस डॉक्टरांविरोधातील कायद्यात सुधारणा करण्यासाठी पोलीस विभाग, आरोग्य विभाग, वैद्यकीय शिक्षण विभाग, महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल आणि इंडियन मेडिकल कौन्सिल यांच्या प्रतिनिधींचा समावेश असलेली समिती लवकरच गठीत केली जाणार आहे. ही समिती कायद्यात कोणते बदल आवश्यक आहेत, याविषयी सूचना देणार असल्याचे राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी सभागृहात स्पष्ट केले.

- राज्यातील अनेक बोगस डॉक्टरांविरोधात गुन्हे दाखल असले तरी ते तीन–चार वर्षांपासून प्रलंबित आहेत. त्यामुळे कायदेशीर बाबी अधिक प्रभावी करण्यासाठी शासन सज्ज होत आहे. दरम्यान, बागलाण तालुक्यातील बोगस डॉक्टरांविरोधात लवकरात लवकर योग्य ती कारवाई केली जाईल, असे ठाम आश्वासनही मंत्री माधुरी मिसाळ यांनी दिले.

# जलजीवन योजनेला खोडा घालणाऱ्या विरुद्ध गुन्हे दाखल करा : खा. वाकचौरे

**नायक वृत्तसेवा, राजूर**

केंद्र शासनाच्या महत्त्वकांक्षी जलजीवन योजनेसाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध होऊनही ठेकेदार आणि प्रशासनाच्या मनमानी कारभारामुळे अकोले तालुक्यातील एकही योजना पूर्ण होऊ शकली नाही, त्यामुळे यास जबाबदार आसणाऱ्यांवर गुन्हे दाखल करावेत असे निर्देश खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांनी दिले.



आदिवासी भागातील नागरिकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी अकोले तालुक्यातील राजूर येथील आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयात खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी तालुक्यातील विविध भागातील नागरिकांनी जलजीवन मिशनच्या कामांच्या तक्रारींचा पाढा खासदार वाकचौरे यांच्या पुढे वाचला. त्यावर खासदार वाकचौरे यांनी या महत्त्वाकांक्षी योजनांना खोडा घालणाऱ्यांवर गुन्हे दाखल करावेत असे निर्देश दिले. आढावा बैठकीत उपस्थित असणाऱ्यांचे प्रकल्प अधिकारी देवकन्या बोकडे यांनी स्वागत केले. गटविकास अधिकारी अमर माने, जिल्हा परिषद सदस्या सुनीता भांगरे, वनक्षेत्रपाल डी. डी. पडवळे, रुपेश गावित, अशोक धिंदळे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता टी. डी. दहिफळे, जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता एस. एस. घुगे, महावितरणचे उपअभियंता व्ही. बी. सोनवणे, तालुका आरोग्य अधिकारी श्याम शेटे, स. पो. नी. दिपक सरोदे, विविध विभागांचे पदाधिकारी,मच्छिंद धुमाळ, संतोष मुर्तडक, महेश नवले, सुरेश गडाख, विविध गावांचे सरपंच आदी उपस्थित होते.

या आढावा बैठकीत सरपंच आणि नागरिकांनी आपल्या भागातील रस्ते, वीज, पाणी, आरोग्य आणि शिक्षण आदी बाबतच्या समस्या खासदार वाकचौरे यांच्या पुढे मांडल्या. या बाबत उपस्थित कामचुकार अधिकाऱ्यांना त्यांनी खडे बोल सुनावले.

यावेळी खासदार वाकचौरे यांनी गाव तेथे रस्ता, स्मशानभूमी, पाणंद शिवार, नकाशातील तसेच नकाशा बाहेरील रस्त्यांसाठी निधी उपलब्ध करून देणार असल्याचे सांगितले. केंद्र सरकारच्या विविध योजनांचा महिला आणि तरुणांनी लाभ घ्यावा असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

# पवार, पिंजारी कुटुंबीयांचे खा. वाकचौरे यांच्याकडून सांत्वन



**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

भूमिगत गटार प्रकरणात मृत्युमुखी पडलेल्या अतुल पवार आणि त्याला वाचवण्यासाठी गेलेल्या रियाज पिंजारी या दोघांच्या कुटुंबियांचे खा. भाऊसाहेब वाकचौरे यांनी त्यांच्या घरी जात सांत्वन केले.

यावेळी बोलंताना खासदार वाकचौरे म्हणाले की, झालेली घटना अतिशय दुर्दैवी आहे. मृत्यूमुखी पडलेल्या अतुल पवार आणि रियाज पिंजारी या दोघांचेही कुटुंब अगदी गरीब असून त्यांचे जीवन हातावरचे आहे. सरकारने या दोन्ही कुटुंबांना भरघोस मदत करण्याची गरज आहे. केंद्र आणि राज्य सरकारच्या ज्या काही योजना असतील त्या योजनातून या दोन्ही कुटुंबांना लाभ मिळायला हवा असे सांगून ते म्हणाले की, या दोन्ही कुटुंबाला माझ्या परीने होईल तेवढी मदत मिळवून देण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न करेल. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष चंद्रकांत घुले, दैनिक नायकचे संपादक गोरक्षनाथ मदने, रोहित वाकचौरे, अमर कतारी, यांच्यासहित महाविकास आघाडीतील घटक पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**संगमनेर : दैनिक नायकचे सरव्यवस्थापक म्हणून अश्विन मुथा यांनी जबाबदारी स्वीकारल्यानंतर त्यांचा सत्कार करतांना संपादक गोरक्षनाथ मदने, वृत्तसंपादक चंद्रकांत शिंदे पाटील, व्यवस्थापक सचिन मदने, मार्केटिंग अधिकारी राजेंद्र गागरे, बाळासाहेब घुले आदी.**

# साकुर येथे सर्पदंशाने महिलेचा मृत्यू

**नायक वृत्तसेवा, साकुर**

संगमनेर तालुक्यातील साकूर शिवारातील पवार वस्ती येथे अंजनाबाई सदाशिव पवार (वय ७०) या महिलेचा सर्पदंशाने मृत्यू झाल्याची घटना सोमवार दि. १४ जुलै रोजी सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास घडली.

साकूर शिवारातील पवार वस्ती येथील अंजनाबाई सदाशिव पवार या सोमवारी सायंकाळी घराजवळ वाळत घातलेले कपडे काढण्यासाठी गेल्या होत्या. यावेळी अचानक त्यांचा पाय विषारी सापावर पडला.



सापाने त्यांच्या उजव्या पायाला दंश केला. त्यानंतर अंजनाबाई यांना साकूर येथील ग्रामीण रुणालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. तेथून त्यांना लोणीच्या प्रवरा ग्रामीण रुणालयात नेत असताना वाटेतच त्यांचा मृत्यू झाला. त्यामुळे परिसरातील नागरिकांनी पावसाळ्यात आपापल्या घराजवळ फिरताना काळजी घ्यावी.

नायक ANCHOR

# दुर्गापुर-चिंचपूर पाझर तलाव दुरुस्तीचा शुभारंभ!

## तीन गावांच्या होणार पाणी पातळीत वाढ

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

राज्याचे जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली राहाता तालुक्यातील दुर्गापुर आणि संगमनेर तालुक्यातील चिंचपूर शिव रस्त्यालगत असलेल्या जलसंधारण विभागाच्या पाझर तलाव दुरुस्तीचा शुभारंभ नुकताच पार पडला.



दुर्गापुर आणि चिंचपूर शिव रस्त्यालगत असलेल्या जलसंधारण विभागाच्या पाझर तलावाच्या दुरुस्तीचा शुभारंभ पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखान्याचे माजी चेअरमन कैलास तांबे यांच्या हस्ते करण्यात आला. या पाझर तलावाची दुरुस्ती झाल्यानंतर त्याचा फायदा राहाता तालुक्यातील दुर्गापूर आणि संगमनेर तालुक्यातील चिंचपूर परिसरासह चंद्रापूर परिसरातील शेतकऱ्यांच्या शेतातील विहिरीच्या पाणी पातळीत वाढ होण्यासाठी होणार आहे. जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनी विखे पाटील आणि नगर दक्षिणचे माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ह्या कामाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखान्याचे माजी चेअरमन कैलास तांबे, गिताराम तांबे, नाना पुलाटे, सुनिल जाधव, छगन पुलाटे, बाबासाहेब तांबे, प्रशांत तांबे यांच्यासह दुर्गापूर, चंद्रापूर, चिंचपूर परिसरातील शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या पाझर तलावाची दुरुस्ती झाल्यानंतर याचा फायदा वरील तीन गावातील शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात होणार आहे. त्यामुळे या भागातील शेतकऱ्यांनी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, शालिनी विखे पाटील, माजी खा. डॉ. सुजय विखे पाटील यांचे आभार मानले आहेत.


# रोटरीच्या डिस्ट्रिक्ट डायरेक्टरपदी प्रा. विद्याचंद्र सातपुते यांची निवड



**नायक वृत्तसेवा, अकोले**

रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ च्या डिस्ट्रिक्ट डायरेक्टर क्लब अडमिनिस्ट्रेशनच्या रिव्हेन्यू डिस्ट्रिक्ट चेअर जिल्हाध्यक्षपदी रोटरी क्लब अकोलेचे प्राचार्य विद्याचंद्र सातपुते यांची निवड करण्यात आली.

यावेळी लिटरसीच्या डिस्ट्रिक्ट असोसिएट डायरेक्टर(झोन - इ) पदी डॉ. रवींद्र डावरे, ह्युमन डेव्हलपमेंटच्या रिव्हेन्यू डिस्ट्रिक्ट चेअर पदी सचिन आवारी, न्यू क्लब एक्सटेन्शनच्या रिव्हेन्यू डिस्ट्रिक्ट चेअर पदी सचिन शेटे यांची तर रोटरी क्लब ॲक्शन प्लॅन चॅम्पियन पदी सचिन देशमुख यांची नियुक्ती करण्यात आली असल्याची माहिती रोटरी क्लबचे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर सुधिर लातुरे यांनी दिली.आंतरराष्ट्रीय पातळीवर काम करणाऱ्या रोटरी क्लबची स्थापना अकोले येथे २०१७ मध्ये करण्यात आली.





कुटे हॉस्पिटल अ‍ॅण्ड लॅप्रोस्कोपी सेंटर
स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिशमनाय्
४० फुटी डी. पी. रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
फोन : (०२४२५) २२६६८८, २२६६८६
डॉ.सोनाली प्र. कुटे (M.B.B.S., D.A.) Physician & Anaesthetists Reg.No. 2005/093398
डॉ.प्रदीप भा. कुटे (M.S., Shalya) Laproscopic Surge & Endoscopist Reg.No. I-45801-A
● मॉड्युलर ऑपरेशन थिएटर ● एसी/डिलक्स रुम्स् ● महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना उपलब्ध ● तज्ज्ञ डॉक्टर्स व प्रशिक्षित स्टाफ ● डायलेसिस विभाग ● इन्टरकॉम, टीव्ही ● ९ बेडस्‌चा सुसज्ज आय.सी.यु. विभाग व सुसज्ज अपघात विभाग ● नर्स कॉल बेल सिस्टिम ● गरम पाण्यासाठी सोलर ● सेंट्रल ऑक्सिजन व सक्शन ● सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया ● सर्व प्रकारचे मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा उपलब्ध ● अत्याधुनिक सुविधा ● ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा ८८८ ८८८ २२२५